# दोडामार्ग येथे २ पासून स्वच्छता मोहिमेस प्रारंभ

कसई दोडामार्ग : येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दोडामार्ग शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून त्याचा प्रारंभ २ ऑक्टोबरपासून होणार आहे.

ग्रामपंचायत दोडामार्ग व लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोडामार्ग शहरातील प्रमुख रस्त्यांची स्वच्छता व प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे. सकाळी ९ वाजता कसई दोडामार्ग ग्रामपंचायत सरपंच संतोष नानचे यांच्या हस्ते पिंपळेश्वर चौकात महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यावर महात्माजींची आवडती प्रार्थना म्हणण्यात येणार आहे. त्यानंतर स्वच्छता प्रसारार्थ चौकातच एनएसएसचे विद्यार्थी पथनाट्य सादर करणार आहेत. त्यानंतर भेडशी रोड, सावंतवाडी रोड, आयी रोड व गोवा रोड या चार प्रमुख रस्त्यांवरील कचरा गोळा करून तसेच रान काढून रस्ते लखख करण्यात येणार आहेत. यासाठी कसई दोडामार्ग ग्रामपंचायतीने सर्व मदत देऊ केली आहे. ग्रामपंचायतीच्या सहकार्यातून २०१९ पर्यंत ही मोहीम राबविली जाणार आहे. दोडामार्ग शहर स्वच्छ व सुंदर व्हावे, यासाठी समाजसेवी संस्था व शासकीय कार्यालयांनीही या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. एस. यु. दरेकर व प्रा. आर. ए. मोरे यांनी केले आहे. (वार्ताहर)